महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार

(ग्रामपंचायत शाखा)

ई मेल nandurbargram@gmail.com

दुरध्वनी क्रमांक ०२५६४-२१०००६

**************************************************************************************

दिनांक ०५/०४/२०२१

जा.क्र. ग्रापंवि/जिपपंस/कावि/३७४ /२०२१

निवडणूक प्राधान्य
अतितात्काळ

प्रति,

१. जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी, नंदुरबार
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जि. प. नंदुरबार
३. तहसिलदार, नंदुरबार/शहादा/अक्कलकुवा
४. गट विकास अधिकारी, पं.स. नंदुरबार/शहादा/अक्कलकुवा
५. नायब तहसीलदार, अभिलेख शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार.

विषय :- नंदुरबार जिल्हा परिषद व त्यांअंतर्गत पंचायत समिती मधील रिक्त पदांची निवडणूक २०२१ करीता मतदार यादीचा कार्यक्रम....

संदर्भ :- मा. राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र यांचे कडील पत्र क्रमांक/रानिआ/ जिपपस-२०२१/ प्र.क्र.०५/का.७ दि.१७/०३/२०२१

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, नंदुरबार जिल्हा परिषद व पंचायत समिती मधील रिक्त पदांची निवडणूक – २०२१ करीता दिनांक ०५/०४/२०२१ रोजी मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्याबाबत सोबत प्रसिध्दी पत्रक देण्यात येत असुन, सदर सुचना आपल्या कार्यालयातील सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येऊन त्यास व्यापक प्रसिध्दी द्यावी व सदर प्रसिध्दी अहवाल तात्काळ इकडील कार्यालयास सादर करावा. तसेच NIC विभाग यांनी सदरचे प्रसिध्दी पत्रक जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

५/४/२१

( बबन काकडे )
उपजिल्हाधिकारी (महसूल प्रशासन),
नंदुरबार

Scanned with CamScanner

# प्रसिध्दी पत्रक

मा.राज्य निवडणूक आयोग यांचेकडील दिनांक १७/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये नंदुरबार जिल्हा परीषद व त्याअंतर्गत असलेल्या पंचायत समित्यांमधील रिक्त पदांच्या निवडणूकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम सुरु आहे. या प्रयोजनासाठी दिनांक १५/०१/२०२१ ही तारीख अधिसूचित करण्यात आलेली असुन, या तारखेस अस्तित्वात असलेली विधानसभा मतदार यादी संबंधित निवडणूक विभाग /निर्वाचक गणात विभागून निवडणूक विभाग /निर्वाचक गणनिहाय प्रारुप मतदार यादी तयार करण्यात आली आहे. सदर निवडणूकीसाठी प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी दिनांक **०५/०४/२०२१** रोजी संबंधित तहसील कार्यालय व पंचायत समिती कार्यालयातील सूचना फलकावर, तसेच निवडणूक विभागातील ग्रामपंचायत, गावातील चावडीवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर प्रारुप मतदार यादीवर दिनांक **०५/०४/२०२१ ते १२/०४/२०२१** पर्यंत संबंधितांकडून हरकती व सूचना मागविण्यात येत आहेत. प्राप्त हरकती व सूचना विचारात घेऊन दिनांक **२०/०४/२०२१** रोजी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती मधील रिक्त पदांच्या निवडणूकांकरीता प्रभाग निहाय मतदार याद्या अंतिम व अधिप्रमाणित करून प्रसिध्द करण्यात येणार आहेत. तसेच त्यावरुन दिनांक **२७/०४/२०२१** रोजी मतदान केंद्रांची यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे.

**दिनांक:-०५/०४/२०२१**
**ठिकाण :- नंदुरबार**

5/4/21

**( बबन काकडे )**
**उपजिल्हाधिकारी (महसूल प्रशासन),**
**नंदुरबार**

Scanned with CamScanner